जिल्हाधिकारी कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत,धुळे
(पुरवठा विभाग)
दुरध्वनी क्रमांक- ०२५६२-२८८७०७

क्रमांक/पुरवठा-५/कावि/ ३७५ /२०१७ धुळे, दिनांक- १६/१०/२०१७

प्रती,
म. वेब को-कॉर्डीनेटर,
तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे

**विषय :-** जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य निवड करणेबाबतची जाहीरात प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र.ग्राराप-१०१३/प्र.क्र.११९/ग्रासं-२, दि.१९ ऑक्टोबर, २०१३.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जिल्हा ग्राहक संरक्षण परीषदेवर अशासकीय सदस्यांची निवड करणेकामी यासोबत जोडलेली फेर जाहिरात, निवडीचे निकष व परिशिष्ट-अ,ब इ. माहिती धुळे जिल्ह्याचे संकेतस्थळावर **दिनांक २३/१०/२०१७** रोजी प्रसिध्द करणेस विनंती आहे.

(प्रमोद भामरे)
सहा.जिल्हा पुरवठा अधिकारी,धुळे

# जिल्हाधिकारी धुळे (पुरवठा शाखा)

## जिल्हा ग्राहक सरंक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य निवडीबाबत फेर जाहिरात

जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडुन धुळे जिल्हासाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर एकूण २८ अशासकीय सदस्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषा नुसार निवडावयाचे आहेत. निवड करावयाच्या अशासकीय सदस्यांचे प्रवर्गाबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | प्रवर्ग निहाय सदस्य प्रकार | निवड करावयाचे सदस्य संख्या |
|---|---|---|
| १. | जिल्हा परिषद सदस्य | ०२ |
| २. | महानगरपालिका/नगरपरिषदांचे सदस्य | ०२ |
| ३. | पंचायत समिती सदस्य | ०२ |
| ४. | कृषी उत्पन्न बाजार समिती प्रतिनिधी | ०२ |
| ५. | ग्राहक संघटनाचे प्रतिनिधी | १० |
| ६. | शाळा/महाविद्यालये यांचे प्रतिनिधी | ०२ |
| ७. | वैद्यक व्यवसायांचे प्रतिनिधी | ०२ |
| ८. | व्यापार व उद्योग क्षेत्राचे प्रतिनिधी | ०२ |
| ९. | पेट्रोल व गॅस विक्रत्यांचे प्रतिनिधी | ०२ |
| १०. | शेतक-याचे प्रतिनिधी | ०२ |
| | एकुण | २८ |

जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्य निवडीसाठी म.जिल्हाधिकारी, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती गठीत केली आहे. सदर अशासकीय सदस्य निवडीचे निकषा बाबतच्या प्रक्रियेची सर्व माहिती व अटी www.dhule.nic.in (एन.आय.सी.धुळे) या संकेतस्थळावर व जिल्हा पुरवठा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय ,धुळे (पुरवठा शाखा) येथे विहित अर्जाचा नमुना (परिशिष्ट - अ) उपलब्ध करण्यात आला आहे. तरी पात्र संस्था व व्यक्ती यांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसात अर्ज **(दिनांक २२/११/२०१७)** पर्यंत म.जिल्हाधिकारी, (पुरवठा शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांच्या कार्यालयात समक्ष अथवा पोष्टामार्फत मुदतीत पोहचतील अशा बेताने सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

क्रमांक/पुरवठा-५/कावि/३७५ /२०१७
जिल्हा पुरवठा कार्यालय, धुळे
धुळे, दिनांक :- /०९/२०१७
१६/१०/२०१७.

(डॉ.दिलीप पांढरपट्टे)
जिल्हाधिकारी,धुळे

# जिल्हा ग्राहक सरंक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य निवडीबाबत

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र.ग्रारा-२०१३/प्र.क्र.११९/ ग्रासं-२, दि.१९ ऑक्टोबर, २०१३ नुसार जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांच्या निवडीचे निकष व कार्यपध्दती अधिक सविस्तर देणेत आली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**१. जिल्हा ग्राहक सरंक्षण परिषदेची उद्दीष्टे :-** ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम ८-ब अन्वये विहित केल्याप्रमाणे जिल्हयात ग्राहकांच्या हक्काचे संवर्धन व संरक्षण करणे.

**२. जिल्हा ग्राहक परिषदेवरील अशासकीय सदस्य-** वरील संदर्भीय दि.२२ मार्च, २००५ व ९ ऑक्टोबर, २०१२ च्या अधिसुचना व दि.२ ऑगष्ट, २०१० च्या आदेशान्वये जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर प्रवर्गनिहाय खालील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

(क) जिल्हा परिषदेचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके सदस्य,

(ख) महानगरपालिका/नगरपरिषदांचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके सदस्य,

(ग) पंचायत समितीचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके सदस्य,

(घ) कृषि उत्पन्न बाजार समितीचे **दोन पेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(ड) ग्राहक संघटनांचे **दहापेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी**

(च) शाळा/महाविद्यालये यांचे **दोनपेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(छ) वैद्यक व्यवसायांचे **दोनपेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(ज) व्यापार व उद्योग क्षेत्राचे **दोनपेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(झ) पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे **दोनपेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी,

(त्र) शेतक-यांचे **दोनपेक्षा कमी** नसतील इतके प्रतिनिधी.

**३.निवड समिती-**

(अ) जिल्हा स्तरावरील जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांच्या निवडीसाठी शासनाकडून खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| संबंधित जिल्हयाचे पोलीस अधीक्षक | - सदस्य |
| जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष | - सदस्य |
| संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी | - निमंत्रक |

(ब) जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवर अशायकीय सदस्यांची निवड वरील निवड समितीमार्फत करण्यात येईल. निवड झालेल्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी यांनी निर्गमित करावेत.

**४. निवडीचे निकष :-** जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती खालील निकषांच्या आधारे करण्यात यावी:-